ePaper
औरंगजेबच्या कबरीवरून नागपुरात जमाव आक्रमक; मुख्यमंत्र्यांकडून शांततेचे आवाहन

वर्ष - 8 । अंक - 239 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™

### आतील पानांत

- आयपीएल मोफत पाहता येणार
- युवराज खेळाडूशी भर मैदानात भिडला
- वक्फ विधेयकाविरोधात निदर्शने!
- 8 व्या वेतन आयोगाची तयारी सुरू!

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 18 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## बीड मधील गुंडगिरी फोफावली ; वरदहस्त शरद पवारांचा?

# बीडचे 'गुंडे'; पवारांच्या तालमीतले!

## राजकीय पक्ष कोणताही असो ; तयार झाले एकाच मुशीत !

। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**एकेकाळी शांत असणाऱ्या बीड जिल्ह्यात गेल्या आठ-दहा वर्षात जी गुंडगिरी फोफावली, त्याला कारणीभूत एकमेव ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत, असा आरोप जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिक करीत आहेत. गुंड कोणत्याही पक्षाचा असो, तो पवारांच्या मुशीतच तयार झाला आहे, आणि त्याला वरदहस्त हा शरद पवार यांचाच आहे, असे सगळेजणच ठामपणे सांगतात. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या आरोपांमुळे या मुद्द्याला पुष्टीच मिळाली आहे.**



### शरद पवार काय म्हणतात...

पत्रकार परिषदेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राज्यातील जातीयवादावर निशाणा साधला. राज्यांमधील परिस्थिती अत्यंत वाईट असून सरकारने कठोर पावले उचलली पाहिजेत, अशी सूचना शरद पवार यांनी केली आहे. पण, बीड मधील नागरिकांनी याचा कठोर समाचार घेतला आहे.

### कोणामुळे जातीयवाद वाढला?

सर्वांचा एकच प्रश्न आहे, की महाराष्ट्रातील जातीयवाद कोणी वाढवला ? बीड जिल्ह्यामध्ये जातीयवाद वाढवणारे काही नेते निर्माण झालेले आहेत, ते शरद पवार यांच्या तालमीतच तयार झाल्याचा आरोप बहुतेकांनी केला आहे. जातीयवाद वाढवणारे, आता सकाळचे दोन भोंगे झाले आहेत. बिखारी शब्द वापरणारे जितेंद्र आव्हाड आणि संजय राऊत यांना पाठिंबा आणि वरदहस्त हा शरद पवार यांचाच ना, असे लोक उघडपणे बोलू लागले आहेत.

### शरद पवार यांचे डायलॉग

जातीयवादाचा विचार करताना शरद पवार यांनी पूर्वी केलेली वक्तव्ये आठवा. एकेकाळी पेशव्यांची नियुक्ती छत्रपती करायचे, आता छत्रपतींची नियुक्ती पेशवे करतात, हे शरद पवार म्हणाले होते ना? शेतकऱ्यांची आंदोलने करणाऱ्या राजू शेट्टी यांची जात त्यांनी काढली होती. अनेक वेळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे यांची त्यांनी उघडपणे जात काढली आहे.

### छत्रपतींना जातीचा पुरावा मागणारे..

एकदा छत्रपती उदयनराजे यांना जातीचा पुरावा मागणारे शरद पवार यांचे चेले होते, हे विसरून कसे चालेल ? तुमचा देव आम्ही निर्माण केला, असे म्हणणारे हेच शरद पवार ! आणि पवार मागणी करतात, त्याप्रमाणे कारवाई केली तर हातकड्या घालून सभागृहात येण्याचे नाटक करणारे यांचेच चेले जितेंद्र आव्हाड !

### दमानिया खरेच बोलल्या..

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीड मधील गुंडगिरीचा लेखाजोखा मांडताना, शरद पवार यांचा खरपूस समाचार घेतला आहे. तेथील गुंडांना मोठे करण्यात शरद पवार यांचा हात असल्याचा आणि त्यांच्या अंगाला बारामतीची माती लागल्याचा आरोप उघडपणे होत आहे. केवळ पंकजा मुंडे सोडून बाकी सर्वजण शरद पवार यांच्या मुशीमध्येच घडले असल्याचे बीडमध्ये बोलले जात आहे.

### जयसिंग गायकवाड यांचे काय?

पूर्वी मूळ भाजपामध्ये असणारे नेते जयसिंग गायकवाड नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले, तेथून व्हाया शिवसेना पुन्हा भाजपा मध्ये आले. पण शरद पवारांच्या उपस्थितीत त्यांच्या प्रवेशाच्या वेळी अत्यंत अश्लाध्य भाषा वापरली गेली होती, हे बीड चे नागरिक विसरलेले नाहीत. भाजपाचे नेते प्रमोद महाजन यांनी आपल्या बहिणीचा पदर कुठे आणि कुणाशी बांधला, असे उद्गार काढण्यापर्यंत या शरद पवारांच्या चेल्यांची मजल गेली होती.

### उदाहरण अमोल मिटकरींचे बघा..

जातीयवाद वाढवला म्हणून टाहो फोडणारे सगळेच्या सगळे शरद पवार यांच्या आश्रयाला राहून गेले आहेत. जातीयवाद पसरवणाऱ्या माणसांना शरद पवार मोठे करतात, हा इतिहास आहे. अगदी शेवटचे उदाहरण टीव्हीवर छत्रपती शिवरायांची आणि शंभूराजांची भूमिका करणाऱ्या अमोल कोल्हे या नतद्रष्टाचे.. त्यांनी पावला पावलाला जातीयवाद पेरण्याचा उद्योग केला. छत्रपतींशी गद्दारी करणाऱ्या ६५ जणांपैकी केवळ तिघांच्या नावावर त्यांच्या मालिकेचे एपिसोड च्या एपिसोड त्यांनी सादर केले आणि तीन ब्राह्मणांचा उद्धार करून संपूर्ण जातीलाच झोडपले. शिवाय या तालमीतील अमोल मिटकरी आहेतच. ..आणि आता शेवटची गोष्ट अशी की मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोट मालिकेच्या वेळी न झालेला बॉम्बस्फोट माध्यमांना सांगून एका विशिष्ट समाजाची तळी उचलण्याचा प्रयत्न पवार साहेब तुम्हीच केला ना?

### शरद पवार यांच्या तालमीत तयार झालेल्या गुंडांची फौज!

ज्या गुंडांमुळे बीडचे वातावरण बिघडले. गुंडगिरी, दहशतवाद, हिंसाचार आणि खंडणी वसुली करणाऱ्या सर्वांच्याच अंगाला बारामतीची माती लागल्याचे सांगण्यात येते. तहसीलदाराला धमकी देणारे, वडिलांना घरात मारहाण करणारे आमदार संदीप क्षीरसागर, आमदार सुरेश धस, धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित आणि आत्ताचे आमदार विजयसिंह पंडित, क्षीरसागर यांचा अख्खा परिवार जयदत्त, संदीप, भारतभूषण, रवींद्र.. त्याचप्रमाणे आडसकर आणि दौंडे परिवार हा शरद पवार यांच्या तालमीतलाच !

## पाण्यामुळे १० ते १२ विद्यार्थिनींना पोटदुखी

# शासकीय वसतिगृहात दूषित पाणी?

### सामाजिक न्यायमंत्री शिरसाट यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**समाजकल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असलेल्या खडकवासल्यातील शासकीय वसतिगृहातील दूषित पाण्यामुळे १० ते १२ विद्यार्थिनींना पोटदुखी, मळमळ, उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला असून तशी तक्रार वसतिगृह प्रशासनाकडे विद्यार्थिनींनी केली आहे. दरम्यान, जलशुद्धीकरण यंत्राच्या तपासणीनंतर यंत्रामध्ये कोणताही बिघाड नसल्याचा खुलासा विधिमंडळाच्या अधिवेशनात करण्यात आला.**



समाजकल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असलेल्या खडकवासल्यातील शासकीय वसतिगृहातील दूषित पिण्याच्या पाण्यामुळे काही विद्यार्थिनी पोटदुखी, मळमळ असा त्रास होऊन अंगावर खाज आणि पुरळ आल्याचा प्रकार जानेवारी महिन्यात उघडकीस आला होता. त्याबाबतची माहिती विधापरिषदेत आमदार योगेश टिळेकर यांनी तारांकित प्रश्नोत्तरावेळी विचारली. वसतिगृहातील विद्यार्थिनींनी वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणती खबरदारी घेण्यात आली; तसेच या प्रकरणातील दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली, अशी विचारणा टिळेकर यांनी केली. त्याला उत्तर देताना सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दूषित पिण्याच्या पाण्याची तक्रार आल्याची माहिती दिली.'वसतिगृहील विद्यार्थिनींना पोटदुखी, मळमळ असा त्रास होत असल्याची तक्रार प्रशासनाकडे करण्यात आली आहे. त्रास झालेल्या विद्यार्थिनींना नजीकच्या रूग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. वसतिगृहातील जलशुद्धीकरण यंत्राची तपासणी केली असता, यंत्रामध्ये कोणताही बिघाड आढळून आला नाही. तसेच विद्यार्थिनीना स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरठा करण्याची कार्यवाही वसतिगृह स्तरावर करण्यात येत आहे. त्यामुळे कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही,' अशी माहिती मंत्री शिरसाट यांनी सभागृहात दिली.समाजकल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असलेल्या खडकवासल्यातील शासकीय वसतिगृहातील दूषित पिण्याच्या पाण्यामुळे काही विद्यार्थिनी पोटदुखी, मळमळ असा त्रास होऊन अंगावर खाज आणि पुरळ आल्याचा प्रकार जानेवारी महिन्यात उघडकीस आला होता.

त्याबाबतची माहिती विधापरिषदेत आमदार योगेश टिळेकर यांनी तारांकित प्रश्नोत्तरावेळी विचारली. वसतिगृहातील विद्यार्थिनींनी वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणती खबरदारी घेण्यात आली; तसेच या प्रकरणातील दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली, अशी विचारणा टिळेकर यांनी केली. त्याला उत्तर देताना सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दूषित पिण्याच्या पाण्याची तक्रार आल्याची माहिती दिली.'वसतिगृहील विद्यार्थिनींना पोटदुखी, मळमळ असा त्रास होत असल्याची तक्रार प्रशासनाकडे करण्यात आली आहे. त्रास झालेल्या विद्यार्थिनींना नजीकच्या रूग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. वसतिगृहातील जलशुद्धीकरण यंत्राची तपासणी केली असता, यंत्रामध्ये कोणताही बिघाड आढळून आला नाही. तसेच विद्यार्थिनीना स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरठा करण्याची कार्यवाही वसतिगृह स्तरावर करण्यात येत आहे.

### वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार

मंत्री शिरसाट यांनी सभागृहात दिलीसमाजकल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असलेल्या खडकवासल्यातील शासकीय वसतिगृहातील दूषित पिण्याच्या पाण्यामुळे काही विद्यार्थिनी पोटदुखी, मळमळ असा त्रास होऊन अंगावर खाज आणि पुरळ आल्याचा प्रकार जानेवारी महिन्यात उघडकीस आला होता.

---

## एक धक्का और दो... औरंगजेब की कब्र तोड़ दो!

### विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"देश का बल बजरंग दल.. छत्रपती के सन्मान में, बजरंग दल मैदान में.. हटली पाहिजे हटली पाहिजे औरंगजेब ची कबर हटली पाहिजे... एक धक्का और दो.. औरंगजेब की कब्र तोड़ दो" अशा घोषणा देत विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्यावतीने क्रूरकर्मा औरंग्याची कबर हटाव, या मागणीसाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्यावतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करण्यात आले.**




यावेळी विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन,आणि प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, प्रांत गौरक्षा प्रमुख ऋषिकेश भागवत, पूर्व पुणे मंत्री धनंजय गायकवाड, प्रांत विशेष संपर्क सह प्रमुख श्रीकांत चिल्लाळ, पूर्व पुणे बजरंग दल विभाग संयोजक सुशांत गाडे, सह संयोजक आकाश दुबे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी किशोर चव्हाण म्हणाले, क्रूरकर्मा औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर ही स्वतंत्र भारत देशात गुलामीचे, अनंत यातनांचे प्रतीक आहे. त्यामुळे ही कबर पूर्णपणे नष्ट करायला हवी. जर शासनाने ही कबर नष्ट केली नाही,तर विश्व हिंदू परिषद बजरंग दल हिंदू समाजाला सोबत घेऊन कारसेवा करुन ती कबर उध्वस्त करेल,असा इशारा यावेळी त्यांनी दिला. यावेळी नितीन महाजन म्हणाले, भारताला इस्लामिक राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या प्रवृत्तीला औरंगजेबाच्या कबरीतून प्रेरणा मिळते. महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर ही कबर काढावी. अन्यथा, बजरंग दल स्वभिमानी हिंदू समाजाला घेऊन रस्त्यावर उतरेल,अशी भूमिका मांडत लवकरात लवकर औरंगजेबाची कबर काढून टाकण्यात यावी,अशी देखील त्यांनी मागणी केली.

### कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी

विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन,आणि प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, प्रांत गौरक्षा प्रमुख ऋषिकेश भागवत, पूर्व पुणे मंत्री धनंजय गायकवाड, प्रांत विशेष संपर्क सह प्रमुख श्रीकांत चिल्लाळ, पूर्व पुणे बजरंग दल विभाग संयोजक सुशांत गाडे, सह संयोजक आकाश दुबे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

## पीसीएमसीमध्ये हवा प्रदूषणासाठी कारणीभूत

# दोन आरएमसी प्लँटला ‘दणका’!

### आ. महेश लांडगे यांचे मंत्र्यांना पत्र : महानगरपालिका प्रशासनाची कारवाई

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात हवा प्रदूषणाची पातळी वाढली असून, ठोस उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून, वाकड परिसरात हवा प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या दोन आरएमसी प्लँट चालकांना नोटीस बजावली आहे. तसेच, संबंधित प्लँक कायमस्वरुपी बंद करण्याचा इशारा दिला आहे.**




अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने शहरातील हवा प्रदूषणाच्या मुद्यावर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना आमदार महेश लांडगे यांनी पत्राद्वारे कारवाईची मागणी केली होती. काही दिवसांपूर्वी वाकड-ताथवडे- पुनावळे आणि हिंजवडी परिसरातील आयटीएन्सनी हवा प्रदूषणाच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते.

पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरात हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) सजीवांसाठी धोकादायक पातळीजवळ आहे. याबाबत महानगरपालिकेच्या पथकाने पाहणी केली. त्यामध्ये संबंधित आरएससी प्लँटमुळेच मोठ्या प्रमाणात धूळ येत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने निर्धारित केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचे पालन केले जात नाही, अशी बाब समोर आली आहे. महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेली आहे.

#### फौजदारी गुन्हा दाखल करणार!

महानगरपालिका अधिनियम, कलक 214 अनुसरुन पर्यावरणास हानी पोहोचवणारा आपला आरएसमसी प्लँट सील का करण्यात येवू नये? याबाबत 3 दिवसांत लेखी स्वरुपात कळवावा. अन्यथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 376 (अ) नुसार फौजदारी गुन्हा दाखल करुन आपल्या उद्योगामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होत असल्याने आपला आरएमसी प्लँट कायमस्वरुपी बंद करण्यात येईल, अशी नोटीस प्रशासनाने संबंधितांना पाठवली आहे.

“ वाढते नागरिकरण आणि पर्यावरण संवर्धन याचे आव्हान मानवजातीसमोर आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील हवा प्रदूषणाची स्थिती दिवसेंदिवस धोकादायक पातळीच्या दिशेने सुरू आहे. काही दिवसांपूर्वी, कुदळवाडी येथील भंगार दुकानांवर अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये हवा प्रदूषण, नदी प्रदूषण हा कळीचा मुद्दा होता. सामान्य नागरिकांना प्रदूषणमुक्त जीवनमान देण्यासाठी प्रशासन आणि आम्ही लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घेतला पाहिजे. आरएमसी प्लँटधारकांसह विविध व्यावसायिक, उद्योजकांनीही प्रदूषणाच्या मुद्यावर सतर्क आणि जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे.

**–महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## “जय भवानी जय शिवाजी”चा जल्लोष!

### शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांच्या उपस्थितीत शिवजयंती उत्साहात साजरी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड मधील आकुर्डी भागामध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. “जय भवानी जय शिवाजी”च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.**

#### नागरिकांसमोर अनेक प्रश्न


सुलभा उबाळे म्हणाल्या शिवसेनेच्या माध्यमातून या भागातील प्रश्न तडीस न्यायचे आहेत. सर्वसामान्य कष्टकरी वर्गाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे आहे. येथील नागरिकांना शिवसेनेकडून अनेक अपेक्षा आहेत. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची, त्यांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी आपली आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या भागांमध्ये प्रशासकीय राजवट आहे. प्रशासकीय राजवटीमुळे नागरिकांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते.या प्रश्नांसाठी शिवसैनिक नागरिकांच्या पाठीशी उभा ठाकला पाहिजे असे आवाहन यावेळी उबाळे यांनी केले.

शिवसेनेच्या (शिंदे गट) उपनेत्या सुलभा उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आकुर्डी येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांच्या पुढाकारातून शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, माजी नगरसेविका वैशाली काळभोर उपस्थित होत्या. सुलभा उबाळे यांची शिवसेना उपनेते पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कारही करण्यात आला.

यावेळी प्रमोद कुटे म्हणाले, सुलभा उबाळे यांच्यासारख्या रणरागिणी, आक्रमक नेतृत्व आपल्या सोबत आल्यानंतर या भागातील शिवसेनेची ताकद वाढणार आहे. महिला शक्तीची एकजूट उबाळे यांच्या पाठीशी आहे.



## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### काळजी आपल्याला भगवंतापासून दूर करते.

सत्त्वगुणात भगवंत असतो; तेव्हा त्या मार्गाने आपण जावे. भगवंत आपल्यात यायला सर्व कर्मे चांगल्या प्रकारे केली तरी ती भगवंतार्पण बुद्धीने करावी. व्यवहार सोडू नये, प्रयत्नही कसून करावा; परंतु त्याबरोबर मन भगवंताकडे कसे लागेल इकडे लक्ष द्यावे. आपण प्रपंचाची जितकी काळजी घेतो, तितकी जरी देवाची घेतली तरी खूप होईल. आपण किती परस्वाधीन आहोत हे आजारी पडलो म्हणजे समजते; तेव्हा आपल्या हातात किती सत्ता आहे हे ओळखून राहावे. काळजी न करतादेखील प्रयत्न होणार नाही असे नाही. उलट प्रयत्न दुप्पट करावेत; पण जे फळ येईल ते भगवंताच्या इच्छेने आले या भावनेने समाधान मानायला पहिल्यांदा आपण शिकावे. आपण स्वत:बद्दल काळजी करतो याचे कारण असे की, आपण आपल्यापेक्षा जास्त दु:खी असलेल्या माणसाकडे पाहात नाही. एक म्हणतो की, मला लोकांच्या 'देण्याची' काळजी आहे; दुसरा म्हणतो की, मला लोकांकडून माझे येणे 'येण्याची' काळजी आहे; तर तिसरा म्हणतो की, मला माझ्या मुलाबाळांची काळजी आहे. पण काळजीच्या या सर्व घोटाळ्यामध्ये आपली स्वत:ची काळजी कुणालाच नाही ! मागल्या आठवणींनी आणि उद्याच्या भीतीने आपण काळजी करीत बसतो. ही काळजी आपल्याला भगवंतापासून दूर करते. उद्याच्या काळजीने आजची भाकरी आपल्याला गोड लागत नाही, याला काय करावे? यावर रामबाण असा एकच उपाय आहे; तो म्हणजे आजपासून काळजी करण्याचे अजिबात सोडून देऊन तेवढा वेळ भगवंताच्या नामस्मरणात घालविणे.

एका माणसाने माझ्यापाशी तक्रार केली की, "काय करावे, हा माझा मुलगा कशाचीच काळजी करीत नाही, नुसता हसतखेळत दिवस घालवितो; पुढे याचे कसे व्हायचे ?" मी म्हटले, "तुमचे म्हणणे वरवर खरे दिसते; पण वास्तविक पाहता ते खरे नाही. तुम्ही आजपर्यंत इतकी काळजी करून काय मिळविले? शारीरिक आणि मानसिक त्रास भोगला आणि भगवंताला विसरला, इतकेच ना ? मग तेच तुमच्या मुलाला का शिकविता ? त्याने आपले कर्तव्य जरूर करावे आणि आनंदात राहावे; पण काळजी करू नये असेच मी त्याला सांगेन." तुम्ही प्रपंचाची काळजी करता तोपर्यंत देवाची सेवा करता असे कसे म्हणावे? 'असले तर असू दे आणि नसले तर नसू दे' अशा मनाच्या अवस्थेत जो राहील त्यालाच काळजी सुटेल.

**बोधवचन:- ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजी नाही.**

# पाकिस्तानच्या फॅक्टरीमध्ये, प्रॉडक्शन - ए- दहशतवाद !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**पाकिस्तानातील कुख्यात दहशतवादी ठार मारण्याची जबाबदारी कुणीतरी 'अज्ञात' शार्प शूटरने उचललेली दिसते. पाकिस्तानातीलच नव्हे, तर जगात लपून बसलेले दहशतवादी गोळ्या बसून ठार झाल्याचे वृत्त येते आणि त्यांना ठार करणारा मात्र पसार झालेला असतो. गेल्या एक-दोन वर्षात किमान शंभर पेक्षा जास्त दहशतवादी यमसदनाला पाठवणारा ही अज्ञात व्यक्ती कोण ? हे मात्र न उलगडलेले कोडेच आहे.**

अज्ञात कोण आहे किंवा ही मोहीम कोणत्या देशाने हाती घेतली आहे, हे कालांतराने उघड होईलच. पण, एखादी मोठी यंत्रणा कार्यरत असल्याशिवाय असे कुख्यात वॉन्टेड दहशतवादी टिपणे शक्य होणार नाही, हे सर्वांनाच मान्य करावे लागेल.

### रोज दहशतवादी मैदानात..

दररोज दहशतवादी यमसदनाला पाठविले जात असले तरी त्याच्या दुप्पट वेगाने पाकिस्तानात दहशतवादी घडवले जात आहेत, ही जास्त चिंतेची बाब आहे. दहशतवादी घडवणारी पाकिस्तान जणू मोठी फॅक्टरीच बनला आहे. असे म्हणण्यासाठी म्हणूनच भरपूर वाव आहे. बरे, पाकिस्तानाच्या खाणीतून बाहेर पडलेले हे दहशतवादी कोणत्याही देशात सापडतात आणि ठार मारले जातात. लीबिया, सीरिया, सोमालिया या आणखी काही देशांमध्येही दहशतवादी घडवण्याचे कारखानेच्या कारखाने सुरू आहेत आणि जागतिक शांतता बिघडवण्यासाठी जे करता येईल ते हे दहशतवादी करत आहेत.

### दहशतवादी राष्ट्र म्हणून घोषित करा..

पाकिस्तानची आर्थिक स्थिती एवढी ढासळली आहे, की संपूर्ण देशाची राजनीती या दहशतवाद्यांच्या ताब्यात गेली आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये दहशतवाद, नागरिकांच्या मूलभूत गरजांना फाटा, महिला आणि मुलींची अवहेलना.. थोडक्यात काय, बंदुकीच्या टोकावर जे जे करता येणे शक्य आहे, ते हे दहशतवादी करून घेत आहेत. कदाचित, त्यांना ठार करणारे शूटर त्यांच्याच देशातील असावेत !

### जहाल हाफिज सईद पोरका झाला...

पाकिस्तानात लष्कर- ए - तोयबा, जैश - ए - मोहम्मद या दहशतवादी संघटनांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. दहशतवाद्यांसाठी तळ उभारणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या हातात मशीनगन देऊन त्यांना जगभर पाठवणे आणि खंडणीच्या रूपाने मिळणाऱ्या प्रचंड पैशातून पुन्हा हे तळ चालवणे हा त्यांचा एक कलमी कार्यक्रम म्हणावा लागेल. यातील काही दहशतवादी मग सीमा ओलांडून भारतात प्रवेश करतात आणि भारतीय सैनिकांना तसेच निष्पाप नागरिकांना 'टार्गेट' करून हिंसाचार घडवतात.

### हाफिज सर्व दहशतवाद्यांचा म्होरक्या

पाकिस्तानात जे दहशतवादी वास्तव्य करतात, त्यात दाऊद इब्राहिम एवढाच कुख्यात हाफिज सईद हा आहे. अनेक दहशतवाद्यांचा तो म्होरक्या मानला जातो. अत्यंत तल्लख बुद्धिमत्ता आणि पाकिस्तान सरकारने पोसलेला असल्यामुळे मस्तीमध्ये वावरत शेजारील राष्ट्रांना त्रास देणे, दहशतवाद घडवणे आणि पाकिस्तानच्या लष्कराच्या तालावर नाचणे, ही या हाफिजची मुख्य भूमिका आहे. हाफीज चा उजवा हात समजला जाणारा अबू कताल हा दोन दिवसांपूर्वी असाच मारला गेला आणि अचानक हाफीज याची ताकद कमी झाल्याचे मथळे पाकिस्तान मध्ये झळकले.

### अबू कतालचा खात्मा महत्त्वाचा..

हाफिज पेक्षाही खतरनाक असलेला हा अबू कताल हा पाक व्याप्त काश्मीर मध्ये दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे चालवायचा, आणि त्या माध्यमातून भारतातील काश्मीर खोरे अस्थिर कसे राहील, ही त्याची जबाबदारी होती. याशिवाय, भारतामध्ये गेल्या काही वर्षात जे बॉम्बस्फोट झाले त्यांचा 'मास्टर माईंड' हा अबू कताल होता, अशी माहिती तेथील वृत्तपत्रांनी दिली आहे.

### '२६/११' चा 'मास्टरमाईंड..'

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड हा कताल होता. आपल्याला आठवत असेल की त्या २६/११ च्या हल्ल्यात १६६ निष्पाप नागरिक मृत्यूमुखी पडले होते. त्याच्याच लष्कर- ए - तोयबाच्या दहशतवाद्यांनी मुंबई एका वेळी किमान दहा ठिकाणी हल्ले केले होते. पाकिस्तानात ही दहशतवादाची फॅक्टरी जोमात सुरू असताना त्यांना संपवण्याचे कामही अनेक जागतिक सुरक्षा संघटना करीत आहेत, त्यांची नावे प्रसिद्ध होत नाहीत एवढेच !

### पाक ने 'जे पेरले तेच उगवले..'

आपल्याकडे एक म्हण आहे, दुसऱ्याचे घर जाळू पाहणाऱ्या व्यक्तीचे स्वतःचेच घर त्याच आगीत नष्ट होते, याची प्रचिती पाकिस्तानला नक्की येत आहे. दहशतवादाची पेरणी करतात आणि त्याची फळे हिंसाचाराच्या माध्यमातून त्यांना भोगावी लागतात, हे कोणीही नाकारणार नाही. आर्थिकदृष्ट्या जवळपास दिवाळे निघालेला हा दळभद्री देश आहे. मदतीसाठी रोज कोणत्या ना कोणत्या देशाकडे हात पसरावे लागत आहेत. थोडक्यात, 'कुणी मदत करता का, मदत' असे म्हणत कटोरा घेऊन जगभर भीक मागण्याची वेळ पाकिस्तान सरकारवर आली आहे.

### भारत, बांगलादेशातील दहशतवाद

लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट अशी आहे, की भारत आणि बांगला देशातील दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या पाकिस्तानचे अफगाणिस्तानमधील तालिबान्यांशीही घनिष्ट संबंध होते. मात्र, नंतर त्यांच्याशी आता फाटले आहे आणि इकडे अंतर्गत दहशतवादाचा जोर आता वाढतच चालला आहे. भारतात दहशतवादी कारवायांना खतपाणी घालताना आणि हिंसाचार हा एकमेव अजेंडा राबवताना हा भस्मासूर उलटला आहे.

### बलुचिस्तानचा उठाव आणि वास्तव..

पाकिस्तानच्या जोखडातून सुटण्यासाठी त्यांचा एक भाग असलेल्या बलुचिस्तानमध्ये गेल्या आठवड्यात मोठा उठाव झाला आणि स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी पुढे आली. तेथील रेल्वे अपहरण प्रकरणास भारत जबाबदार असल्याचा आरोप पाकने केला. हल्ल्यात भारताचा थेट सहभाग नसला, तरी त्यांनी या दहशतवादी कृत्यास खतपाणी घातल्याची आगपाखड केली. जाफर एक्स्प्रेसचे अपहरण करून त्यात २१ प्रवासी ठार झाले. वास्तविक, हे कृत्य बलुचिस्तानातील बंडखोरांनी केले असून, त्याच्याशी भारताचा काहीही संबंध नाही, पण संशयाचे बोट भारताकडे दाखवल्याशिवाय त्यांना चैन पडत नसावे.

### भारतावर खापर फोडण्याचा कांगावा..

या पाकिस्तानच्या नाकर्तेपणामुळे फोफावलेल्या दहशतवादाचे खापर हा देश भारतावर फोडत असून, तो धादांत खोटे आरोप करत आहे, असा प्रतिहल्ला भारताच्या परराष्ट्र विभागाचे सचिव रणधीर जयस्वाल यांनी केला आहे आणि खरे वास्तव पुढे आणले आहे.

### 'सर्जिकल स्ट्राइक' नेही अक्कल आली नाही..

दहशतवादी प्रशिक्षण तळ उभे करणाऱ्या पाकला सर्जिकल स्ट्राईक करून भारताने चांगलीच अद्दल घडवली. पण, दहशतवादी प्रवृत्तींना पोसणाऱ्या पाकलाच आता ठिकठिकाणी दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. तालिबानशी संबंधित असलेल्या 'तेहरीक-ए-जिहाद' या गटाने मोठा हल्ला करून पाकचे सैनिक मारले. त्यापूर्वी, बलुचिस्तान आणि खैबर पख्तूनख्वाँमध्ये हल्ले होऊन १७ जणांचा मृत्यू झाला.असे दहशतवादी हल्ले पाकिस्तानला आता नवे राहिले नाहीत.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नागपूरमध्ये हिंसाचार!

## पोलीस कर्मचाऱ्यांसह अग्निशमन दलाचा जवान जखमी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**औरंगजेबाच्या कबरीच्या वादामुळे नागपूरमध्ये हिंसाचार झाला आहे. दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेकीनंतर परिसरात तणावपूर्ण परिस्थिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या महाल परिसरात दोन गटातील लोक समोरासमोर आले. दोन्ही गटातील लोकांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर जाळपोळही करण्यात आली. यामध्ये अनेक वाहनांची तोडफोडही करण्यात आली. त्यानंतर पोलिसांना लाठीचार्ज करून गर्दी पांगवावी लागली. सध्या परिसरात तणाव असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**



यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले,"नागपूरच्या महाल परिसरात ज्या पद्धतीने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे ती अत्यंत निषेधार्ह आहे. काही लोकांनी दगडफेक केली, अगदी पोलिसांवरही. हे चुकीचे आहे. मी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे."या घटनेवर व्हिडीओद्वारे प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, "कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेली कठोर पावले उचलण्याचे मी पोलिस आयुक्तांना सांगितले आहे. जर कोणी दंगल केली किंवा पोलिसांवर दगडफेक केली किंवा समाजात तणाव निर्माण केला तर अशा सर्व लोकांवर कठोर कारवाई केली पाहिजे. नागपूरची शांतता बिघडू नये यासाठी मी सर्वांना आवाहन करतो. जर कोणी तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल."नागपूरचे डीसीपी अर्चित चांडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, "ही घटना काही अफवांमुळे घडली आहे. आता परिस्थिती नियंत्रणात आहे. आमचे पथक येथे उपस्थिती असून, मी सर्वांना आवाहन करतो की कोणीही कारणाशिवाय घराबाहेर पडू नका. किंवा दगडफेक करू नका. दगडफेक सुरू होती, म्हणून आम्ही बळाचा आणि अश्रूधुराचा वापर केला." अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, "२ जेसीबी आणि २-३ इतर वाहने पेटवण्यात आली आहेत. यात आमचा एक अग्निशमन कर्मचारी जखमी झाला आहे."नागपूरमधील हिंसाचारात काही पोलिसही जखमी झाले आहेत. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही असे म्हटले आहे. याचबरोबर ही घटना जर नियोजीत असेल तर दुर्दैवी असल्याचेही म्हटले.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "नागपूरच्या महाल परिसरात ज्या पद्धतीने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे ती अत्यंत निषेधार्ह आहे. काही लोकांनी दगडफेक केली, अगदी पोलिसांवरही. हे चुकीचे आहे. मी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

### आता परिस्थिती नियंत्रणात आहे

या घटनेवर व्हिडीओद्वारे प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, "कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेली कठोर पावले उचलण्याचे मी पोलिस आयुक्तांना सांगितले आहे. जर कोणी दंगल केली किंवा पोलिसांवर दगडफेक केली किंवा समाजात तणाव निर्माण केला तर अशा सर्व लोकांवर कठोर कारवाई केली पाहिजे. नागपूरची शांतता बिघडू नये यासाठी मी सर्वांना आवाहन करतो. जर कोणी तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल."नागपूरचे डीसीपी अर्चित चांडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, "ही घटना काही अफवांमुळे घडली आहे. आता परिस्थिती नियंत्रणात आहे.


---

# औरंगजेबाची कबर आम्हाला उखडता येणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मुघल शासक औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे आहे. ही कबर नष्ट करण्यात यावी, अशी मागणी केल्या काही दिवसांपासून जोर धरू लागली आहे. मागच्या आठवड्यात हिंदुत्ववादी संघटनांनी कबर उखडून टाकण्याची तयारीही केली होती. मात्र राज्य सरकारने मोठा फौजफाटा कबरीच्या ठिकाणी तैनात करून प्रतिबंधक कारवाई केली. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका मांडली.**



दुर्दैवाने सरकारला या कबरीचे संरक्षण करावे लागत आहे, असे त्यांनी म्हटले.छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने भिवंडीत पहिल्या शिव मंदिराचे लोकार्पण सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या सोहळ्यात बोलत असताना फडणवीस यांनी औरंगजेबाच्या कबरीवर भाष्य केले.यावेळी ते म्हणाले, या देशात महिमामंडन होईल, तर ते छत्रपती शिवरायांच्या मंदिराचे होईल, औरंगजेबाच्या कबरीचे होणार नाही. खरंतर औरंग्याची कबर आपल्या महाराष्ट्रात कशाला हवी? असा प्रश्न पडेल. पण आपल्याला कल्पना आहे. भारतीय पुरातत्व विभागाने या कबरीला ५० वर्षांपूर्वी संरक्षित स्थळ म्हणून घोषित केलेले आहे. म्हणून त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारची आहे. ज्या औरंग्याने आमच्या हजारो लोकांना मारले, दुर्दैवाने त्याच्याच कबरीचे संरक्षण आम्हाला करावे लागत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, पण यानिमित्ताने एक वचन देतो. काहीही झाले तरी या महाराष्ट्रात औरंग्याच्या कबरीचे महिमामंडन होऊ देणार नाही. त्याचे उदात्तीकरण होऊ देणार नाही. जर उदात्तीकरण करण्याचा कुणी प्रयत्न करत असेल तर त्याचा प्रयत्न चिरडून टाकण्याचे काम आम्ही करू. खासदार उदयनराजे भोसले यांनी सर्वात आधी औरंगजेबाची कबर उखडून टाकावी, असे म्हटले होते. "औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना त्रास देणाऱ्या, छत्रपती संभाजी महाराजांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या या औरंगजेबाच्या कबरीचे या महाराष्ट्रात उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत. हे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच उखडून टाकली पाहिजे", असे मत छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केले होते.औरंगजेबाची कबर हटविण्यासंदर्भात इतिहासकारांनी अभ्यास करून राज्याला योग्य तो रस्ता दाखवावा.

### उदयनराजेंनी केली होती मागणी

इतिहासकारांच्या अभ्यासातूनच योग्य काय, अयोग्य काय हे ठरेल. प्रत्येकाची आस्था वेगळी असते. राज्य सरकारने या सर्वांच्या आस्थेचा आदर करावा, अशी भूमिका राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी (१६ मार्च) मांडली.

# वक्फ विधेयकाविरोधात निदर्शने!

## »राालोआच्या घटक पक्षांना ओवैसींचा सावधगिरीचा इशारा

**।नवी दिल्ली।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**केंद्र सरकार आणत असलेल्या वक्फ (सुधारणा) विधेयकाविरोधात ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) दिल्लीत आयोजित केलेल्या निदर्शनांना अनेक खासदारांनी हजेरी लावली. हे विधेयक आणण्यामागे देशातील शांततेत व्यत्यय आणणे हा केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा हेतू असल्याचा आरोप ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे (एआयएमआयएम) प्रमुख असादुद्दीन ओवैसी यांनी केला.**




यावेळी ओवैसी यांनी सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे घटक पक्ष असलेल्या तेलुगू देसम पक्ष, संयुक्त जनता दल आणि लोक जनशक्ती पक्ष (रामविलास गट) यांना इशारा दिला की, हे विधेयक मंजूर झाले तर मुस्लीम त्यांना कधीही माफ करणार नाहीत. या विधेयकाला पाठिंबा देऊ नका असे आवाहन त्यांनी या पक्षांना केले. जंतर-मंतर येथे झालेल्या या धरणे निदर्शनांना अनेक मुस्लीम संघटना आणि विचारवंतांनी हजेरी लावली. “या विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या मशिदी, दर्गे आणि कब्रस्तान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्ही चंद्राबाबू नायडू, पासवान आणि नितीश कुमार यांना सावधगिरीचा इशारा देत आहोत; लक्षात ठेवा, तुम्ही या महत्त्वाच्या क्षणी या विधेयकाला पाठिंबा दिला तर मुस्लीम तुम्हाला कधीही माफ करणार नाहीत,” असे ओवैसी म्हणाले. इतर धर्मीयांना ज्याप्रमाणे त्यांच्या धार्मिक संस्थांवर अधिकार आहे त्याचप्रमाणे वक्फच्या माध्यमातून मुस्लिमांना अधिकार दिला जातो. जर प्रत्येक धर्माला आपापल्या संस्थांच्या प्रशासनाचा अधिकार आहे तर मुस्लिमांना वेगळे का काढले जात आहे असा प्रश्न जमात-ए-इस्लामी हिंदचे अध्यक्ष सय्यद सदातुल्ला हुसैनी यांनी विचारला. वक्फ विधेयकाच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष मुस्लिमांची दिशाभूल करत आहेत असा दावा भाजपने केला. वक्फ बोर्डाच्या मालमत्तांना कोणताही धोका नाही असे भाजपचे खासदार तेजस्वी सूर्या म्हणाले. विधेयकाला मंजुरी मिळाली तर मालकीहक्क स्पष्ट असलेल्या वक्फच्या मालमत्तांपैकी एक इंचही जागा काढून घेतली जाणार नाही असे त्यांनी सांगितलेजंतर-मंतर येथे झालेल्या या धरणे निदर्शनांना अनेक मुस्लीम संघटना आणि विचारवंतांनी हजेरी लावली.

### विधेयकाला पाठिंबा देऊ नका

ओवैसी यांनी सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे घटक पक्ष असलेल्या तेलुगू देसम पक्ष, संयुक्त जनता दल आणि लोक जनशक्ती पक्ष (रामविलास गट) यांना इशारा दिला की, हे विधेयक मंजूर झाले तर मुस्लीम त्यांना कधीही माफ करणार नाहीत. या विधेयकाला पाठिंबा देऊ नका असे आवाहन त्यांनी या पक्षांना केले.

“या विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या मशिदी, दर्गे आणि कब्रस्तान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्ही चंद्राबाबू नायडू, पासवान आणि नितीश कुमार यांना सावधगिरीचा इशारा देत आहोत; लक्षात ठेवा, तुम्ही या महत्त्वाच्या क्षणी या विधेयकाला पाठिंबा दिला तर मुस्लीम तुम्हाला कधीही माफ करणार नाहीत,” असे ओवैसी म्हणाले. इतर धर्मीयांना ज्याप्रमाणे त्यांच्या धार्मिक संस्थांवर अधिकार आहे त्याचप्रमाणे वक्फच्या माध्यमातून मुस्लिमांना अधिकार दिला जातो. जर प्रत्येक धर्माला आपापल्या संस्थांच्या प्रशासनाचा अधिकार आहे तर मुस्लिमांना वेगळे का काढले जात आहे असा प्रश्न जमात-ए-इस्लामी हिंदचे अध्यक्ष सय्यद सदातुल्ला हुसैनी यांनी विचारला. वक्फ विधेयकाच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष मुस्लिमांची दिशाभूल करत आहेत असा दावा भाजपने केला.

भाजपचे खासदार तेजस्वी सूर्या म्हणाले वक्फ (सुधारणा) विधेयकाविरोधात ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) दिल्लीत आयोजित केलेल्या निदर्शनांना अनेक खासदारांनी हजेरी लावली. हे विधेयक आणण्यामागे देशातील शांततेत व्यत्यय आणणे हा केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा हेतू असल्याचा आरोप ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे (एआयएमआयएम) प्रमुख असादुद्दीन ओवैसी यांनी केला.

---

# 8 व्या केंद्रीय वेतन आयोगाची तयारी सुरू!

## »1 कोटी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना फायदा

**।नवी दिल्ली।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**देशातील सुमारे 1 कोटी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. सरकारने 8 व्या केंद्रीय वेतन आयोगाची तयारी सुरू केली आहे. सरकार 8 व्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींवर (टीओआर) सूचना मागवत आहे. वित्त मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग आणि राज्य सरकारकडून इनपुट मागवले आहेत.**

8 व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे सुमारे 36.57 लाख सरकारी कर्मचाऱ्यांना (1 मार्च 2025 पर्यंत) आणि 33.91 लाख निवृत्तीवेतनधारक/कौटुंबिक निवृत्ती वेतनधारकांना ( 31 डिसेंबर 2024 पर्यंत) थेट फायदा होईल. याशिवाय संरक्षण कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार आणि भत्त्यांमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, सरकारच्या शिफारशींनंतरच पगारवाढीची खरी रक्कम ठरवली जाणार आहे. पंतप्रधानांनी जानेवारी 2025 मध्ये 8 व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली. आयोग सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेईल. यात पेन्शनधारकांच्या पेन्शन रचनेचाही विचार केला जाईल. हा आयोग महागाई, आर्थिक वाढ आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शिफारशी देईल. साधारणपणे दर



10 वर्षांनी नवीन वेतन आयोग स्थापन केला जातो आणि 8 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी 2026 पासून लागू होण्याची शक्यता आहे. 2016 मध्ये लागू झालेल्या 7 व्या वेतन आयोगाने पहिल्या वर्षीच सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार आणि पेन्शन पेमेंटमध्ये 1 लाख कोटी रुपयांची वाढ केली होती. अशा स्थितीत 8 व्या वेतन आयोगाकडून मोठ्या पगार सुधारणाही अपेक्षित आहेत. सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारक आता 2026 मध्ये 8 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होण्याची वाट पाहत आहेत, ज्यामुळे त्यांचे वेतन आणि भत्ते वाढणे शक्य आहे. याशिवाय संरक्षण कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार

### फायदा कोणाला होणार?

65 लाख पेन्शनधारक – सरकारी पेन्शनधारकांना नवीन वेतन रचनेचा फायदा होईल. 4 लाख सरकारी कर्मचारी (दिल्लीमध्ये) – दिल्ली सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होणार आहे. 50 लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी – विविध मंत्रालये, विभाग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयू) च्या कर्मचाऱ्यांना याचा फायदा होईल.

आणि भत्त्यांमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, सरकारच्या शिफारशींनंतरच पगारवाढीची खरी रक्कम ठरवली जाणार आहे. पंतप्रधानांनी जानेवारी 2025 मध्ये 8 व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली. आयोग सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेईल. यात पेन्शनधारकांच्या पेन्शन रचनेचाही विचार केला जाईल. हा आयोग महागाई, आर्थिक वाढ आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शिफारशी देईल. साधारणपणे दर 10 वर्षांनी नवीन वेतन आयोग स्थापन केला जातो आणि 8 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी 2026 पासून लागू होण्याची शक्यता आहे. 2016 मध्ये लागू झालेल्या 7 व्या वेतन आयोगाने पहिल्या वर्षीच सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार आणि पेन्शन पेमेंटमध्ये 1 लाख कोटी रुपयांची वाढ केली होती.

# अरिजीत सिंहने गायलं ‘जीव रंगला’ गाणं, व्हिडीओ व्हायरल

संगीत विश्वातील सध्याचं आघाडीचं नाव म्हणजे अरिजीत सिंह. अरिजीतने आपल्या सुमधूर आवाजाने तरुणाईला अक्षरशः वेड लावलं आहे. त्यामुळेच अरिजीतचा मोठा चाहता वर्ग आहे. त्याचं कुठलंही गाणं असो ते सुपरहिट होतंच. अरिजीत त्याच्या गाण्यांव्यतिरिक्त लाइव्ह कॉन्सर्टमुळे खूप चर्चेत असतो.

त्याच्या लाइव्ह कॉन्सर्टला चाहते तुफान गर्दी करतात. नुकताच पुण्यातील एमसीए इंटरनॅशनल स्टेडियममध्ये अरिजीत सिंहचा लाइव्ह कॉन्सर्ट पार पडला. या कॉन्सर्टमधील सध्या अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील कॉन्सर्टमध्ये अरिजीत सिंहने मराठी गाणं गायलं; ज्याचा व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.

या व्हिडीओमध्ये अरिजीत सिंह मराठी गाणं गाताना दिसत आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता ‘जोगवा’ चित्रपटातील ‘जीव रंगला’ ( JEEV RANGLA ) गाणं अरिजीत सिंहने गाताना पाहायला मिळत आहे. अरिजीतच्या




गोड आवाजात ‘जीव रंगला’ गाणं ऐकून अनेकांच्या अंगावर शहारे आले, अशा प्रतिक्रिया उमटल्या आहेत.अरिजीत सिंहचा हा व्हिडीओ १.८ मिलियनहून अधिक जणांनी पाहिला आहे.

या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, “म्हणून अरिजीत सिंह खूप उत्कृष्ट गायक आहे.” दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “मराठी गाणं खूप छान गातो. गहिवरून आलं.” तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “काय आवाज आहे आणि जबरदस्त.” चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं की, मराठी गाणं गाऊन लोकांची मनं जिंकली. दरम्यान, याआधीही अरिजीत सिंहने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये मराठी गाणी गायली होती. तेव्हादेखील त्याने आपल्या गोड आवाजाने चाहत्यांची मनं जिंकली होती. अरिजीत सिंह जसा सध्या मराठी गाणं गायल्यामुळे चर्चेत आला आहे. तसाच सध्या दुसऱ्या बाजूला पंजाबी प्रसिद्ध गायक हनी सिंगदेखील चर्चेत आला आहे.

## गौरी स्प्रॅट आमिरच्या प्रेमात का पडली?

बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आमिर खान(AAMIR KHAN) हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकताच त्याने त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यानच त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मोठा खुलासा केला. ६० वर्षीय अभिनेता रिलेशनशिपमध्ये आहे. तो दीड वर्षापासून नात्यात असल्याचे त्याने म्हटले. तसेच ज्या मुलीला तो डेट करत आहे, तिची ओळखही करून दिली. गौरी असे तिचे नाव असून ते एकमेकांना गेल्या २५ वर्षांपासून ओळखत असल्याचे आमिर खानने स्पष्ट केले. गौरी स्प्रॅट ही मूळची बंगळूरूमधील असून सध्या ती आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत आहे. आता आमिर खानची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटने मीडियाशी संवाद साधला. त्यावेळी तिने ती आमिर खानच्या का प्रेमात पडली, तिने आतापर्यंत आमिर खानचे किती सिनेमे पाहिले आहेत, यावर भाष्य केले. गौरीने आमिर खानचे किती चित्रपट पाहिले आहेत यावर बोलताना म्हटले की, ‘लगान’ व ‘दिल चाहता है’ हे दोनच सिनेमे मी पाहिले आहेत. पुढे गौरी आमिर खानबरोबरच्या रिलेशनशिपविषयी बोलताना म्हणाली, “प्रेमळ, काळजी घेणारा जेंटलमन पार्टनर किंवा जोडीदार मला हवा होता” गौरीने असे म्हणताच आमिर खानने तिला विचारले की, “त्यानंतर तू मला शोधलेस का?”

## ‘हायवे’साठी आलिया भट्टने आधी दिलेला नकार

सध्याच्या काही आघाडीच्या बॉलीवूड अभिनेत्रींच्या यादीत आवर्जून येणारे नाव म्हणजे आलिया भट्ट (ALIA BHATT). आलियाने तिच्या आजवरच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यापैकीच एक चित्रपट म्हणजे ‘हायवे’ (HIGHWAY). ‘हायवे’ हा चित्रपट आलिया भट्टच्या उत्तम चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात वीरा त्रिपाठीच्या भूमिकेसाठी तिचं खूप कौतुक झालं होतं. या चित्रपटामुळेच ती केवळ उत्तम अभिनेत्री आहे हे सिद्ध झाले. पण, ‘हायवे’ हा चित्रपट करण्यास आलिया सुरुवातीला घाबरली होती? मग नंतर एका व्यक्तीमुळे तिनं यात काम करण्यास होकार दिला. चित्रपटाचे दिग्दर्शक इम्तियाज अली (IMTIAZ ALI) यांनी याबद्दल नुकतंच वक्तव्य केलं. ‘गेम चेंजर्स’साठी कोमल नाहटा यांच्याशी झालेल्या संभाषणात इम्तियाज अली यांनी सांगितलं की, ‘हायवे’साठी ते आधी अनुभवी अभिनेत्रीची निवड करण्याचा विचार करीत होते. या भूमिकेसाठी त्यांना तिशीच्या आसपास वय असलेल्या अभिनेत्रीची आवश्यकता आहे. पण १८ वर्षांच्या आलिया भट्टला भेटल्यानंतर त्यांना ती या भूमिकेसाठी परिपूर्ण असल्याचं जाणवलं.इम्तियाज अली यांनी सांगितले, “आलिया तेव्हा १८ वर्षांची असली तरीही तिच्यात पात्राला आवश्यक असलेली भावनिक खोली होती. तिनं तेव्हा जास्त काम केलं नव्हतं आणि मी तिचा ‘स्टुडंट ऑफ द इयर’ चित्रपटही पाहिला नव्हता; पण ती ज्या पद्धतीनं बोलली, ते खूप आकर्षक होतं. तिच्यात एक गुण होता, जो या चित्रपटासाठी उत्कृष्ट होता. तिच्या याच गुणानं मला खात्री पटवून दिली की, ती या भूमिकेसाठी योग्य आहे.”इम्तियाज अली यांनी पुढे सांगितलं की, “महेश भट्ट यांनी ‘हायवे’ चित्रपटात काम करण्यास आलियाला तयार करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली होती. मी तिच्या घरी जायचो आणि भट्टसाहेब तिला हे काम करण्यासाठी पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. सुरुवातीला ती थोडी घाबरली होती, तिला शंका होती की, ती हे काम करू शकेल की नाही. कारण- हा चित्रपट सोपा नव्हता. पण नंतर तिनं होकार दिलाच.”दरम्यान, आलिया भट्टच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर, तिचा आगामी चित्रपट ‘अल्फा’ आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर शर्वरी वाघदेखील



## सलमानच्या फार्महाऊसवर घालवलेले 3 दिवस

कन्नड अभिनेता किच्चा सुदीपची मुलगी सान्वीने ‘दबंग ३’ चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानच्या भाईजानबरोबरच्या आठवणी सांगितल्या आहे. किच्चा सुदीपने ‘दबंग ३’मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. सिनेमाचं शूटिंग सुरू होतं तेव्हा सान्वी १५ वर्षांची होती. ती सलमानची खूप मोठी चाहती होती, त्यामुळे तिच्या वडिलांबरोबर शूटिंगला आली होती. सलमानबद्दल गैरसमज आहेत, तो खूप चांगला आहे, असं सान्वी म्हणाली. ‘दबंग ३’ सिनेमा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगसाठी वडिलांबरोबर मुंबईत आलेल्या सान्वीचे सलमान खानने खूप लाड केले होते.जिनल मोदीला दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना २१ वर्षीय सान्वीने सिनेमाच्या शूटिंग्च्या आठवणी सांगितल्या. “जेव्हा पप्पा ‘दबंग ३’ चित्रपटाचे शूटिंग करत होते, ते माझ्या आयुष्यातील सर्वात मजेदार दिवस होते. मी लहानपणी सलमान खान यांच्यासाठी एक ब्रेसलेट बनवले होते आणि त्यांनी ते बिग बॉसमध्येही घातले होते. त्यामुळे ‘दबंग ३’ दरम्यान भेटल्यावर ती आठवण ताजी झाली,” असं सान्वी म्हणाली.सान्वीने सांगितलं की शूटिंगनंतर तिचे वडील तिला मुंबईला घेऊन गेले आणि ते सलमानच्या घरी जेवायला गेले. सलमानच्या घरी जाणं हे सान्वीला तिच्या वडिलांनी दिलेलं सरप्राइज होतं. “मी त्यांना पाहिलं आणि मी विचार करत होते की अरे देवा, हे तर सलमान सर आहेत. त्या दिवशी त्यांनी माझे खूप लाड केले. त्यांनी मला गाणं गाण्यास सांगितलं. मग मी त्यांच्यासाठी गाणं गायलं,” असं सान्वी म्हणाली.त्यांनी पहाटे ३ वाजता एका संगीत दिग्दर्शकाला फोन केला आणि मी हिला तुझ्याकडे पाठवत आहे असं सांगितलं. ते म्हणाले की हिचा आवाज रेकॉर्ड करून ठेव, जर एखाद्या कामासाठी आपल्याला तिच्या आवाजाची गरज भासली तर आपण वापरू. नंतर दुसऱ्या दिवशी मी त्या संगीत दिग्दर्शकाकडे गेले.



## दीपिका पादुकोणच्या ‘त्या’ लूकने वेधले लक्ष

बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE)ची ओळख आहे. दीपिका पादुकोणने २००७ साली ‘ओम शांती ओम’ या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. शाहरुख खानबरोबरचा हा चित्रपट चांगलाच गाजल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटाचे दिग्दर्शन फराह खानने केले होते. त्याआधी अभिनेत्रीने २००६ साली कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. ‘ऐश्वर्या’ असे या चित्रपटाचे नाव होते. अभिनेत्रीने ‘यह जवानी है दिवानी’, ‘चेन्नई एक्स्प्रेस’, ‘कॉकटेल’, ‘हॅपी न्यू इयर’, ‘खेलें हम जी जान से’, ‘देसी बॉइज’, ‘लव्ह आज कल’ ते ‘ब्रह्मास्त्र’, ‘जवान’, ‘पठाण’, ‘सिंघम अगेन’, ‘फायटर’ अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांत अभिनेत्री प्रमुख भूमिकेत दिसली होती. तर, दीपिकाचा पती व अभिनेता रणवीर सिंग हादेखील चर्चेत असणारा अभिनेता आहे. ‘लुटेरा’, ‘राम लीला’, ‘बाजीराव मस्तानी’, ‘बेफिकरे’, ‘गुंडे’, ‘दिल धडकने दो’, ‘पद्मावत’, ‘सिम्बा’, ‘गली बॉय’, ‘सिंघम अगेन’, अशा चित्रपटांसाठी तो ओळखला जातो. रणवीर सिंह त्याच्या उत्साहाने नेहमीच सर्वांचे लक्ष वेधून घेतो. तसेच त्यांची अतरंगी कपड्यांची स्टाईल प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत असतात. आता सोशल मीडियावर या सेलिब्रिटी जोडप्याचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे.

# आयपीएलचे सामने मोफत लाईव्ह पाहता येणार!

## येत्या 22 मार्चपासून जिओ हॉटस्टारवर पाहायला मिळणार आयपीएल 2025 चा थरार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ चा थरार येत्या २२ मार्चपासून सुरू होत आहे. २ महिने चालणाऱ्या या स्पर्धेत क्रिकेटप्रेमींना एकापेक्षा एक अटीतटीच्या सामन्यांचा आनंद लुटता येणार आहे. आयपीएल २०२५ मधील पहिला सामना गतविजेते कोलकाता नाईट रायडर्स आणि आरसीबी यांच्यात ईडन गार्डन्सच्या मैदानावर होणार आहे.**




आयपीएल २०२५ पूर्वीच हॉटस्टार आणि जिओ हे लाईव्ह स्ट्रिमिंग ॲपचे विलीनीकरण झाले. त्यामुळे आता जिओ हॉटस्टार नावाचा ॲपवर सर्व सामने लाईव्ह पाहायला मिळत आहेत. साहजिकचं आयपीएलचे सामनेही जिओ हॉटस्टारवर पाहायला मिळणार आहेत. जिओ हॉटस्टारने आता आयपीएल सामने फ्री पाहण्यासाठी नवी योजना आखली आहे. तर टीव्ही चॅनेलवर हे सामने स्टार स्पोर्ट्सवर पाहता येतील.गेल्या वर्षी म्हणजेच IPL 2024 पर्यंत सामन्यांचे लाइव्ह स्ट्रीमिंग JIOCINEMA वर होत होते, जिथे चाहत्यांना सामने विनामूल्य पाहता येत होते. मात्र, यावेळी JIO CINEMA आणि DISNEY PLUS HOTSTAR यांचे विलीनीकरण झाले आहे. त्यानंतर आता IPL 2025 लाईव्ह पाहण्यासाठी चाहत्यांना पैसे मोजावे लागणार आहेत.JIOHOTSTAR चा मोबाईल प्लॅन १४९ रुपयांपासून सुरू होतो, जो तीन महिन्यांसाठी असेल. म्हणजेच १४९ रुपयांमध्ये चाहत्यांना संपूर्ण आयपीएलचा आनंद घेता येईल. याशिवाय एक वर्षाचा प्लॅन ४९९ रुपयांमध्ये उपलब्ध असेल. तर ३ महिन्यांचा सुपर प्लॅन २९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे. मात्र, चाहत्यांना आयपीएल २०२५ पाहण्यासाठी किमान १४९ रुपये मोजावे लागतील.जिओने आयपीएलपूर्वी 'अनलिमिटेड ऑफर' लॉंच केली आहे. ही ऑफर तीन महिन्यांसाठी 4K क्वालिटीसह टीव्ही/मोबाइलसाठी वापरता येणार आहे. घरासाठी JIOFIBER किंवा AIRFIBER कनेक्शनमध्ये ब्रॉडबँड सर्विसेससाठी वेगळा पर्यायही आहे.१७ मार्च ते ३१ मार्च २०२५ दरम्यान नवीन जिओ सिम घेऊन किंवा रिचार्ज करून या ऑफरचा फायदा घेता येईल.जिओ सिम कार्ड पूर्वीपासून असणाऱ्यांसाठी: २९९ रूपये किंवा त्यापेक्षा किमतीचं रिचार्ज ज्यामध्ये १.५GB/दिवस किंवा अधिक)नवीन जिओ सिम कार्ड घेणाऱ्यांसाठी २९९ रूपयांमध्ये नवीन सिम कार्ड घेऊन या ऑफरचा फायदा घेता येईल.ज्या ग्राहकांनी १७ मार्चपूर्वी रिचार्ज केले आहे, ते १०० रुपयांच्या ॲड-ऑन पॅकची निवड करू शकतात.

JIO HOTSTAR पॅक २२ मार्च २०२५ पासून (IPL च्या सुरुवातीच्या सामन्याचा दिवस) ९० दिवसांच्या कालावधीसाठी सक्रिय केला जाईल.

### ऑफरचा लाभ कसा घ्यावा?

मोहम्मद शमी आणि त्याच्या परिवाराला मी आवाहन केले होते की, जे शरीयतमध्ये नमूद केलेले नाही, त्यात तुमच्या मुलांना सहभागी करू नका. होळी हा हिंदूंचा निश्चितच मोठा सण आहे. पण मुस्लीम लोकांनी होळीपासून दूर राहिले पाहिजे.


जर शरीयतचा कायदा माहीत असूनही जर कुणी होळी खेळत असेल तर तो गुन्हा ठरतो", अशी प्रतिक्रिया मौलाना रझवी यांनी दिली आहे.याशिवाय रझवींनी मोहम्मद शमीवर रोजा न पाळल्याबद्दल टीका केली होती. पण भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर त्यांनी संघाचे कौतुक केले आहे. मी टीम इंडियाचे अभिनंदन व्यक्त करतो. तसेच मोहम्मद शमीलाही मनापासून शुभेच्छा देतो, असे मौलाना रझवी म्हणाले.काही दिवसांपूर्वीच मौलाना रझवींनी शमीवर टीका केली होती. ते म्हणाले होते, "इस्लाममध्ये रोझा पाळणे हे कर्तव्य आहे.

# युवराज खेळाडूशी भर मैदानात भिडला

## भारताच्या फायनलमध्ये 'या' कारणावरून झाला वाद

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील इंडिया मास्टर्स संघाने ब्रायन लाराच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज मास्टर्सचा पराभव करून इंटरनॅशनल मास्टर्स लीग या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. इंटरनॅशनल मास्टर्स लीग पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली आणि भारत मास्टर्स संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावले. या सामन्यात अंबाती रायडू, सचिन तेंडुलकर आणि विनय कुमार यांनी इंडिया मास्टर्ससाठी चमकदार कामगिरी केली. तर सामन्यादरम्यान युवराज सिंग आणि वेस्ट इंडिज खेळाडूमधील वादाने सर्वांचे लक्ष वेधले.**



युवराज सिंग नेहमीच त्याच्या झंझावाती फलंदाजीसाठी आणि आक्रमकतेने खेळण्यासाठी ओळखला जातो. युवराजची झंझावाती फलंदाजी तर आपण पाहिली पण अंतिम फेरीत संतापलेला युवराजही पाहायला मिळाला. इंटरनॅशनल मास्टर्स लीग २०२५ च्या अंतिम सामन्यात वेस्ट इंडिज मास्टर्स संघाने प्रथम फलंदाजी करत १४८ धावा केल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना इंडिया मास्टर्स संघ चांगल्या स्थितीत दिसत होता आणि १३व्या षटकात अंबाती रायडू आणि युवराज सिंग त्यांच्यासाठी फलंदाजी करत होते.दरम्यान, १३वे षटक संपल्यानंतर युवराज आणि वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज टिनो बेस्ट यांच्यात वादावादी सुरू झाली. १३ वे षटक टिनो बेस्टने टाकल्यानंतर तो मैदानाबाहेर जात होता. पण युवराजने याबद्दल पंचांना सांगितले आणि त्यामुळे टिनो बेस्टला मैदानात परत यावे लागले आणि यानंतर युवराज सिंग आणि टिनो बेस्ट यांच्यात वाद सुरू झाला. वाद चांगलाच चिघळल्याचे पाहून मैदानावरील इतर खेळाडू पुढे आले आणि त्यांनी प्रकरण शांत केलं.अंबाती रायुडूने इंडिया मास्टर्ससाठी उत्कृष्ट फलंदाजी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. त्याने ५० चेंडूत ९ चौकार आणि तीन षटकारांसह ७४ धावा केल्या. त्याच्याशिवाय सचिन तेंडुलकरने २५ धावांचे योगदान दिले. या दोन खेळाडूंनी पहिल्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी करून मास्टर्सच्या विजयाचा पाया रचला होता.

### अंतिम सामना 6 विकेटने जिंकला

नंतर युवराज सिंग आणि स्टुअर्ट बिन्नी यांनी काही शानदार फटकेबाजी करत संघाला विजयापर्यंत नेले.तर गोलंदाजीत विनय कुमारने अप्रतिम कामगिरी करत तीन विकेट घेतले होते. तर शाहबाज नदीम दोन विकेट मिळवण्यात यशस्वी ठरला. प्रत्युत्तरात अंबाती रायुडूच्या स्फोटक ७४ धावांच्या खेळीच्या जोरावर इंडिया मास्टर्स संघाने १८ व्या षटकात केवळ ४ गडी गमावून लक्ष्य गाठले आणि अंतिम सामना ६ विकेटने जिंकला.युवराज सिंग नेहमीच त्याच्या झंझावाती फलंदाजीसाठी आणि आक्रमकतेने खेळण्यासाठी ओळखला जातो. युवराजची झंझावाती फलंदाजी तर आपण पाहिली पण अंतिम फेरीत संतापलेला युवराजही पाहायला मिळाला. इंटरनॅशनल मास्टर्स लीग २०२५ च्या अंतिम सामन्यात वेस्ट इंडिज मास्टर्स संघाने प्रथम फलंदाजी करत १४८ धावा केल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना इंडिया मास्टर्स संघ चांगल्या स्थितीत दिसत होता आणि १३व्या षटकात अंबाती रायडू आणि युवराज सिंग त्यांच्यासाठी फलंदाजी करत होते.दरम्यान, १३वे षटक संपल्यानंतर युवराज आणि वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज टिनो बेस्ट यांच्यात वादावादी सुरू झाली. १३ वे षटक टिनो बेस्टने टाकल्यानंतर तो मैदानाबाहेर जात होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। मंगळवार ।
। दि. 18 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने “गाथा सन्मानाची” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**



सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या “गाथा सन्मानाची” या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

# ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

## शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे “निर्भय कन्या अभियान” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी,डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात ‘इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम’ या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी ‘वैयक्तिक सुरक्षा’ या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी ‘मानसिक आरोग्य व्यवस्थापन’ या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वत:ची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच अॅनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस. ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वकृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

